पान १ वरुन

किडनी तस्करीच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पर्दाफाश करणाऱ्या ईश्वर कातकडे यांना केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक

आव्हानात्मक कामगिरी त्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या तपासात मोठ्या प्रमाणावर पुरावे संकलित करून या प्रकरणाचा तपास हा केवळ एका गुन्ह्यापुरता मर्यादित न राहता अवैध मानवी अवयव व्यापाराच्या व्यापक जाळ्याचा पर्दाफाश करणारा ठरला. केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकाची स्थापना केंद्रीय गृह मंत्रालयाने १ फेब्रुवारी २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे केली. विशेष अभियान, अन्वेषण, गुप्तचर कार्य आणि न्यायवैद्यक विज्ञान अशा क्षेत्रांतील उत्कृष्ट कामगिरीची दखल घेण्यासाठी हे पदक प्रदान केले जाते. ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या पुरस्कारांमध्ये देशभरातील ४९० अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कातकडे यांच्या कामगिरीचा गौरव म्हणजे तपास यंत्रणेतील व्यावसायिक कौशल्य, चिकाटी आणि कर्तव्यनिष्ठेवर उमटलेली राष्ट्रीय स्तरावरील मोहोर मानली जात आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत राम शिंदेंना धक्का; गुंड-हजारे यांची ऐनवेळी माघार!

जामखेडसाठी सचिन घुमरे, महिला राखीव गटातून मंजुषा गुंड आणि ओबीसी गटातून अजिनाथ हजारे यांना पाठिंबा जाहीर केला होता.

यापैकी सचिन घुमरे यांची निवड बिनविरोध करण्यात राम शिंदे यांना यश आले. मात्र, उर्वरित जागांवर विखे-थोरात गटाच्या उमेदवारांसमोर त्यांनी आव्हान उभे केले होते. त्यासाठी जिल्हा बँकेच्या मतदारांना सहलीसाठी राज्याबाहेर नेल्याचीही चर्चा होती. मात्र, मतदानाच्या अवघ्या काही दिवस आधी मंजुषा गुंड आणि अजिनाथ हजारे यांनी निवडणूक प्रक्रियेतून माघार घेतल्याचे जाहीर केल्याने राजकीय समीकरणे बदलली आहेत. दोन्ही उमेदवारांनी मतदारांना आपल्याला मतदान न करता इतर उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केल्याचे समजते. राम शिंदे यांच्या संपर्क कार्यालयाकडूनही या दोघांनी पॅनलमधून माघार घेतल्याच्या वृत्ताला दुजोरा देण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, सोमवारी होणाऱ्या मतदानात आता कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघात राम शिंदे समर्थक ज्योती शिंदे आणि विखे समर्थक तुषार पिसाळ यांच्यात थेट लढत होणार आहे. या लढतीत कोण बाजी मारणार, याकडे जिल्ह्यातील सहकार आणि राजकीय क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

शनिशिंगणापूर देवस्थान कथित घोटाळा प्रकरणी मुख्य सचिवांना उच्च न्यायालयाची नोटीस

नसल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे. लेखापरीक्षणाची व्याप्ती मोठी असल्याने आणखी १५ ते २० दिवसांची मुदत देण्याची विनंती करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही कार्यवाही पूर्ण न झाल्याने दरंदले यांनी अवमान याचिका दाखल केली. या प्रकरणात ३१ ऑक्टोबर रोजी झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती संदीप कुमार मोरे आणि न्यायमूर्ती वैशाली पाटील-जाधव यांच्या खंडपीठाने मुख्य सचिवांना नोटीस बजावली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. उमाकांत वाघ यांनी युक्तिवाद केला. 'घोटाळ्यांची चौकशी झाल्याशिवाय शांत बसणार नाही!'

नांदूर मधमेश्वरच्या पाण्यासाठी आंदोलन चिघळले !

आंदोलन केले.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन उपविभागीय दंडाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसीलदार सुनील सावंत आणि पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाणी सोडण्याची निश्चित तारीख जाहीर करा, या मागणीवर आंदोलक ठाम राहिले. त्यानंतर जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंता सुनंदा जगताप आणि अधीक्षक अभियंता राजेंद्र धोडपकर यांनी आंदोलकांशी चर्चा केली. येत्या २ नोव्हेंबर रोजी बैठक घेऊन पाणी सोडण्याच्या मागणीवर चर्चा केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले. मात्र, ठोस निर्णय मिळत नसल्याने आंदोलकांनी महामार्गाच्या संपूर्ण रस्त्यावर बसण्याचा प्रयत्न केला. यानंतर पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेण्यास सुरुवात केली. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे आणि जिल्हा परिषद सदस्य पंकज ठोंबरे यांनी आंदोलकांना जबरदस्तीने ताब्यात घेऊ नये, अशी विनंती केली. दरम्यान, महिला आंदोलकांना ताब्यात घेताना चिंचडगाव येथील शेतकरी अनिल काळे यांनी पोलिसांना जाब विचारला.

बाबासाहेब कवाद पतसंस्थेकडून सभासद, सेवक यांच्या खात्यावर १ कोटी २२ लाख लाभांश जमा : चेअरमन वसंत कवाद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

निघोज : बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेने सभासदांना दिवाळीपूर्वी सभासदांना१२ टक्के लाभांश व कर्मचारी यांना १५ टक्के दराने सानुग्रह अनुदान व दिवाळी फराळासाठी १ बॉक्स किराणा किट देण्याचा निर्णय संस्थेचे चेअरमन वसंत कवाद, व्हा. चेअरमन नामदेवराव थोरात व संचालक मंडळ यांनी मासिक मिटींग मध्ये घेतला होता .

यावेळी संस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर यांनी सांगीतले की दि. २६ ऑक्टोबर २०२६ पासुन संस्थेच्या सभासदांना १२ टक्के दराने लाभांश रक्कम ८० लाख ९३ हजार रुपये वाटप सुरू आहे.

त्याचबरोबर सेवकांना १५ टक्के सानुग्रह अनुदान ४१लाख १७ हजार रूपये व संस्थेच्या ९३ सेवकांना व १३ सफाई कर्मचाऱ्यांना प्रत्येकी २ हजार रुपयांचा दिवाळी फराळासाठी किराणा देणार आहे. यावेळी संस्थेचे चेअरमन कवाद यांनी सांगितले की संस्थेच्या सर्व शाखांमध्ये सभासदांना १२ टक्के दराने लाभांश रक्कम सभासदांच्या सेव्हिंग खाते वरती जमा केलेली आहे . तरी सर्व सभासदांनी आपल्या खाते वरती जमा केलेली लाभांश ची रक्कम घेऊन जावी. अशी विनंती केली आहे.

यावेळी संस्थेचे संचालक चंद्रकांत लामखडे, ॲड.बाळासाहेब लामखडे, दामूशेठ लंके, बाबाजी कळसकर, शांताराम कळसकर, ॲड. सुनिल मेसे, बाळशिराम डेरे, अभिजित मासळकर, भिवा रसाळ, सतिष साळवे, दिलीप सोदक, लताबाई कवाद, वैशाली कवाद, संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, जनरल मॅनेजर संपतराव ठुबे, उपव्यवस्थापक शांताराम सुरकुंडे , वरिष्ठ अधिकारी सुनिल तांबे या वेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शांताराम कळसकर साहेब यांनी केले आभार दत्तात्रय लंके यांनी मानले.

> निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी गेली २५ वर्षांपूर्वी या संस्थेची स्थापना केली.सर्वसामान्य जनतेला आर्थिक पाठबळ देण्यासाठी तसेच या पतसंस्थेतील कर्मचारी यांचा संसार स्थिरस्थावर होण्यासाठी अतिशय कार्यक्षमपणे कारभार करुन या संस्थेचा लौकिक अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यात केला आहे. स्व. बाबासाहेब कवाद यांच्या विचाराचे अनुकरण करीत संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ कार्यरत असून सर्वसामान्य जनतेचा विकास आणी ग्रामीण भागाचा विकास पतसंस्था चळवळीच्या माध्यमातून झाला पाहिजे याच संकल्पनेतून संचालक मंडळ कार्यरत असल्याची प्रतिक्रिया सभासद व जनतेतून व्यक्त होत आहे.

बिहाणी विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापकपदी राहुल जगताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : स्थानिक कै. लालाशेठ बिहाणी विद्या मंदिर प्रशालेचे मुख्याध्यापक कैलास अनाप हे दीर्घ रजेवर गेल्याने रिक्त झालेल्या पदावर संस्थेने राहुल जगताप यांची प्रभारी मुख्याध्यापकपदी निवड केली होती. या निवडीला आता माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांची अधिकृत मान्यता मिळाली असून, स्वाक्षरीचे अधिकार मिळाल्याने शाळेतील सर्व प्रलंबित प्रशासकीय व शैक्षणिक कामे मार्गी लागल्याची माहिती प्रभारी मुख्याध्यापक राहुल जगताप यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. मुख्याध्यापक अनाप यांच्या रजेमुळे शाळेच्या दैनंदिन कामकाजावर मोठा परिणाम झाला होता. संस्थेने जगताप यांची नियुक्ती करून मान्यतेचा प्रस्ताव माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवला होता. मात्र, शिक्षण विभागामध्ये एसआयटी चौकशी आणि विविध ऑनलाईन कामांचा ताण असल्याने या प्रस्तावावर स्वाक्षरी होण्यास विलंब झाला होता. अधिकृत स्वाक्षरीचे अधिकार नसल्यामुळे शाळेची अनेक महत्त्वाची कामे खोळंबली होती. यामध्ये शाळेचे वीज बिल थकणे, विद्यार्थ्यांचे शाळा सोडल्याचे दाखले (एलसी), विविध प्रमाणपत्रे व इतर कार्यालयीन



प्रकरणे प्रलंबित राहिली होती; परिणामी शाळा व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अखेर जगताप यांच्या नियुक्ती प्रस्तावास मंजुरी दिली आहे. मान्यता मिळताच प्रशासकीय गतिमानता आली असून, थकलेल्या वीज बिलाचा प्रश्न तसेच विद्यार्थ्यांचे दाखले व इतर महत्त्वाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात येत असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. आता प्रशालेचे कामकाज पूर्ववत सुरळीत सुरू झाले असून पालक व विद्यार्थी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

फातिमा माता चर्चचा यात्रा उत्सव भक्तिभावात संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : राहुरी फॅक्टरी येथील नगर-मनमाड महामार्गालगत असलेल्या फातिमा माता चर्चचा वार्षिक यात्रा उत्सव शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात संपन्न झाला. या उत्सवानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमांत परिसरातील असंख्य भाविकांनी सहभागी होत प्रार्थना, प्रवचन आणि पवित्र मिस्सा बलिदानाचा लाभ घेतला. यात्रेनिमित्त २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान तीन दिवस धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रेव्ह. फा. किशोर विघाते यांनी 'प्रभू येशूची आईचे आदर्श जीवन', रेव्ह. फा. पीटर डिसोझा यांनी 'पवित्र कुटुंब व माझे कुटुंब', तर रेव्ह. फा. विलास सोनवणे यांनी 'प्रभू येशू माझा तारणारा' या विषयांवर मार्गदर्शन केले. शनिवारी यात्रेचा मुख्य धार्मिक सोहळा पार पडला. नाशिक कॅथोलिक धर्मप्रांताचे महागुरुस्वामी बिशप बार्थोल बरेटो यांच्या प्रमुख उपस्थितीत पवित्र मिस्सा बलिदान संपन्न झाले. यावेळी भाविकांनी सामूहिक प्रार्थना करून फातिमा मातेचे दर्शन घेतले. यात्रेनिमित्त महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. गुहा, रावका वस्ती, गुहा फाटा, प्रसादनगर, कणगर, ताहाराबाद, वडनेर, चिंचविहिरे, देवळाली प्रवरा, बिरोबावाडी, मकासरे वस्ती आदी परिसरांतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर प्रकाश राऊत व येशू मरिया सदनच्या सिस्टर सुपीरियर सिस्टर अर्चना कदम यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा कमिटीने उत्सवाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

नारायणपूर ग्रामपंचायत येथे सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : तालुक्यातील नारायणपूर ग्रामपंचायत कार्यालय येथे ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती राष्ट्रीय एकता दिवस म्हणून, तर इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.
माजी सरपंच नासेर पटेल यांच्या हस्ते दोन्ही महान नेत्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच उपस्थितांनी

राष्ट्रीय एकता, अखंडता आणि बंधुभाव जपण्याची शपथ घेतली.
या कार्यक्रमास जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक पाटील , बांगर ,ग्रामपंचायत कर्मचारी मुक्तार शेख, अनिस शेख, हमीद शेख, मोबिन शेख, इकोसत्त्वचे महादेव चांदगुडे, करण जमधडे, संदीप गणराज,अशोक जगधने, पोलीस पाटील ताजुद्दीन पटेल, सद्दाम हसन, अख्तर शेठ, शकील शेख, मुजीफ शेख, अंगणवाडी सेविका सुवर्णा खरात, सविता धोत्रे, इर्शाद बी. चांद, दिव्या शिरसाठ, शीतल जमधडे, सीआरपी शाहीन शेख तसेच जिल्हा परिषद शाळेचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

सहीचे अधिकार कमी करण्याचा प्रकार बेकायदेशीर; न्यायालयात जाणार : डॉ. मुठे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव सोसायटीच्या भाजपच्या चेअरमन द्वारका मुठे यांचा सहीचा अधिकार कमी करण्याचा प्रकार कायदेशीर नसुन. या प्रकारा विरोधात आपण न्यायालयात जाणार असुन, चेअरमन सौ. मुठे यांना घरी जाऊन अनेकदा दमदाटी केली या विरूद्धही आम्ही महिला आयोगात दाद मागणार असुन हिंमत असेल तर अविश्वास ठराव आणुन दाखवा असा इशारा सोसायटीचे संचालक माजी चेअरमन डॉ. शंकरराव मुठे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात केला आहे.

या निवेदनात डॉ मुठे यांनी पुढे म्हटले आहे की जिल्हा बँकेच्या ठरावाचे वेळी तीन पक्ष एकत्र येऊन बँकेचा ठराव अनिल रमेश मुठे यांचा ठराव केला. ग्रामपंचायत निवडणूक डोळ्यासमोर ठेवून रमेश माणिक मुठे यांच्या घरातील स्त्रीला सरपंच पदाच्या निवडणूकीत उभा करण्यासाठीच्या हे-तूने सर्व विरोधक एकत्र येऊन हा ठराव केला होता. ठरावामुळे पैसे मिळतील मोठा आर्थिक लाभ होईल अशी अपेक्षा होती .परंतु जिल्हा बँक निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे त्यांचा हा सर्व प्रयत्न असफल झाल्यामुळे नैराश्याच्या भावनेतून त्यांनी चेअरमन द्वारका मुठे यांच्या विरुद्ध सह्याचा अधिकार काढण्यासाठी अनेक संचालकांना आमिष दाखवून, कोणाला चेअरमन करतो, कोणाला कारखान्याचा ठराव देतो,काही तरूणांना कामगारावरती दबाव आणून. सह्याचा अधिकार काढण्याचा गैरप्रकार घडला. हा प्रकार कायदेशीर नसुन याविरुद्ध आम्ही न्यायालयात जाणार आ-होत हा ठराव बेकायदा केलेला आहे असे द्वारका मुठे व इतर तीन संचालकांनी सांगितले.

जर विरोधाकडे बहुमत आहे तर त्यांनी अविश्वास ठराव आणून दाखवा उगाच महिला चेअरमन द्वारका मुठे यांना शिवाजी मुठे व इतर लोकांनी घरी जावून दमदाटी करणे मानसिक त्रास देणे असे प्रकार त्यांनी थांबवावे मी शिवाजी मुठे यांच्या विरुद्ध लवकरच महिला आयोगाकडे तक्रार करणार आहे.

> **सागर मुठे व बबन मुठे यांचा खरा पक्ष व गट कोणता – डॉ मुठे**
>
> माजी सरपंच सागर मुठे यांचा कोणता गट व कोणता पक्ष आहे असा मला प्रश्न पडतो कारण की दर सहा महिन्यांनी त्यांचा पक्ष बदललेला असतो .प्रारंभी अतिक्रमण केस सागर मुठे यांच्या गटाच्या उज्वला दिघे व गोरख जाधव यांच्या विरुद्ध शिवाजी मुठे, भाजपाचे नव्हे तर शिंदे सेनेचे बबन मुठे, सुभाष मुठे यांनी दाखल केली होती. मुळात यानीच त्रास दिला. त्यांच्याबरोबर सागर मुठे यांनी युती का केली ? बबन मुठे नेमका कोणत्या पक्षाचा आहे ? त्यांनी भाजपा सोडून दोन वर्ष झाली. विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्याशी घनिष्ठ संबंध असल्याचा फेक प्रचार प्रसार करणे हे एकमेव काम आहे.मला ग्रामपंचायत निवडणुकीची चिंता नाही पुढील सरपंच भाजप विखे गटाचाच होईल असा विश्वास डॉ. शंकरराव मुठे,यांनी व्यक्त केला.

आंबेवाडीत अमोल जगताप मित्रमंडळाच्या वतीने शालेय साहित्याचे वितरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर :शहरातील आंबेवाडी येथील जि. प. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना अमोलदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने स्कुल बॅग, कंपास, वाटरबॅग, परीक्षा पॅड अशा शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.यावेळी नगरसेवक नवनाथ कानडे, सामाजिक कार्यकर्ते राहुल वानखेडे, शिक्षक संतोष आळंजकरआंबेवाडी शाळेच्या मुख्याध्यापक स्मिता तगरे मॅडम, सहशिक्षक मंगल सूर्यवंशी मॅडम, अबॅकस शिक्षक पूजा जाधव मॅडम आदींची उपस्थिती होती.

> उपनगराध्यक्ष अमोल दादा जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचे मित्र मंडळांनी जे शैक्षणिक साहित्य दिले ते आजपर्यंत कोणीच आमच्या शाळेला दिलेले नव्हते.. त्यामध्ये स्कूल बॅग, वाटर बॉटल ,कंपास, परीक्षा पॅड आणि विद्यार्थ्यांना पुरी भाजीचे जेवण... या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांसाठी कुतुहल चा क्षण होता.
>
> **स्मिता तगरे..**
> **मुख्याध्यापक जि प प्रा शा आंबेवाडी**

> अमोल जाधव जगताप यांच्या वाढदिवसाचे निमित्ताने यापुढेही जिल्हा परिषदेचे शाळांना व विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करून विद्यार्थ्यांना एक नवचेतना देण्याचा प्रयत्न करू...
>
> **नवनाथ कानडे**
> **नगरसेवक नगरपरिषद गंगापूर उपनगराध्यक्ष**

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा
रविवार दि. १ नोव्हेबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

१४० २३० ७८० | ५-७ | १२४ ४६७ १३३ | ५१-६७-२४-९०-७३

कल्याण
उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

१२६ ४५० ९०० | ९-२ | १५६ २४६ २२८ | ९०-३२-८१-७४-२५

मुंबैम (मेन)
उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

१२३ २४० २६८ | ६-५ | १४० २३० ६९० | ६७-१५-९२-३०-५४

शुभ लाभ

Date	Mon	Tue	Wed	Thu	Fri
27/07/2026 to 31/07/2026	259 60 550	590 42 228	358 62 390	400 47 890	160 70 488
03/08/2026 to 07/08/2026	234 90 569	170 85 159	338 42 129	460 09 478	370 05 348
10/08/2026 to 14/08/2026	577 99 234	230 53 148	250 70 235	355 39 135	133 76 358
17/08/2026 to 21/08/2026	240 60 460	278 73 346	116 82 480	156 23 779	449 77 179
24/08/2026 to 28/08/2026	360 96 790	255 23 229	789 42 237	450 98 440	266 41 290
31/08/2026 to 04/09/2026	149 43 670	170 81 560	159 52 336	690 50 235	577 99 135
07/09/2026 to 11/09/2026	680 47 557	228 27 124	570 26 358	112 43 779	445 33 689
14/09/2026 to 18/09/2026	789 47 124	336 20 136	799 56 178	680 42 345	399 16 790
21/09/2026 to 25/09/2026	390 25 348	457 62 129	480 23 599	166 30 479	150 60 280
28/09/2026 to 02/10/2026	669 19 135	137 18 279	260 84 257	660 29 126	369 84 770
05/10/2026 to 09/10/2026	140 57 250	459 85 168	130 48 567	469 99 126	558 84 590
12/10/2026 to 16/10/2026	160 79 568	290 11 669	122 58 189	130 46 123	257 42 480

माधुरी बाजार डे / नाईट

१३० ३६७ ४५५ | ४-५ | ३४८ ६९० २३० | ४१-४३-५८-५४-५९
८-६-२

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
३४९	२३५
६८	००
४७७	१९०

dpbosssss.live Mydpboss.com

आंबेवाडी येथील जि. प. प्राथ. शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : शहरातील आंबेवाडी येथील जि.प. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना अमोलदादा जगताप मित्र परिवाराच्या वतीने स्कुल बॅग, कंपास, वाटरबॅग, परीक्षा पॅड अशा शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.यावेळी नगरसेवक नवनाथ कानडे, सामाजिक कार्यकर्ते राहुल वानखेडे, शिक्षक संतोष आळंजकरआंबेवाडी शाळेच्या मुख्याध्यापक स्मिता तगरे, सहशिक्षक मंगल सूर्यवंशी, अबॅकस शिक्षक पूजा जाधव आदींची उपस्थिती होती. नवनाथ कानडे नगरसेवक नगरपरिषद गंगापूर उपनगराध्यक्ष अमोल दादा जगताप यांनी जनसेवेचा जो वसा हाती घेतलेला आहे, त्याचाच एक भाग म्हणून आज जिल्हा परिषद शाळा आंबेवाडी मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

१४ नोव्हेंबर पासून राष्ट्रीय संघर्ष समितीच्यावतीने ईपीएस ९५ पेन्शनधारकांचे देशव्यापी आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : राष्ट्रीय संघर्ष समितीच्यावतीने ईपीएस ९५ पेन्शनधारकांच्या पेन्शनवाढीबाबत गेल्या १०/११ वर्षांपासून देशभर व दिल्लीत अनेक आंदोलने झाली आहेत.कामगार मंत्री पंतप्रधान यांचेकडून फक्त आश्वासने मिळत आहेत.पेन्शनधारकांची दिवाळी गोड होणार असल्याचे संकेत राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत यांनी दिले आहेत.तथापि निर्णय न झाल्यास पुढील लढा सुरु राहील असा इशारा दिला आहे.त्यातच १९ नोव्हेंबर रोजी गुजरात गीर येथे सीबीटी मीटिंग आयोजित करण्यात आली आहे त्यात प्रामुख्याने यावर निर्णय होणार आहे अशी सर्वत्र चर्चा आहे. तरी सुद्धा राष्ट्रीय संघर्ष समितीच्यावतीने दिनांक १४ नोव्हेंबर पासून दि ७ व ८ डिसेंबर रोजी दिल्लीत आंदोलनापर्यंत देशभर मेळावे आयोजित करण्यात आले आहेत दि १४ व १५ नोव्हे.-विजयपुरा कर्नाटक,दि १८ – सोमनाथ गुजराथ ,दि १९ रोजी सीबीटी मीटिंग असल्याने गुजराथ आंदोलन,दि २७ रोजी बुलढाणा येथून निघून दि २८ रोजी वाराणसी येथे सभा,दि २९ रोजी रांची ,दि ३० नोव्हे,रोजी लुधियाना येथून निघून २ डिसेंबर रोजी लुधियाना येथे सभा,दि ३ डिसेंबर -डेहराडून मेळावा,दि ५ व ६ दिल्ली आंदोलन मेळावा तयारी दि ७ व ८ डिसेंबर रोजी दिल्लीत देशव्यापी भव्य आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.तरी या सर्व मेळाव्यात पेन्शनधारकांनी अखेरची लढाई समजून एकजूट दाखवावी असे आवाहन पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर व सर्व पदाधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी केले आहे दि ७ व ८ डिसेम्बरसाठी आधीच रेल्वे आरक्षण करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

शेंदुरवादा येथे १० केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गंगापूर तालुक्यातील शेंदरवादा येथील वीज उपकेंद्रांतर्गत असलेल्या जुन्या ५ केव्ही क्षमतेच्या ट्रान्सफॉर्मरमुळे परिसरातील शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. कमी क्षमतेमुळे शेतकऱ्यांना दिवसातून केवळ पाच तास वीजपुरवठा मिळत होता. त्यातही वारंवार वीज खंडित होत असल्याने शेतीच्या कामांवर मोठा परिणाम होत होता. ही समस्या मार्गी लावण्यासाठी शेंदरवादा येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्याकडे निवेदनाद्वारे ५ केव्ही क्षमतेच्या जुन्या ट्रान्सफॉर्मरऐवजी १० केव्ही क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी केली होती. ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत आमदार प्रशांत बंब यांनी गेल्या तीन वर्षांपासून यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून, नवीन १० केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर मंजूर करून प्रत्यक्ष बसविण्यात आला आहे.

या नवीन ट्रान्सफॉर्मरमुळे परिसरातील शेतकऱ्यांना पूर्वीच्या पाच तासांऐवजी आठ तास वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असून, वारंवार वीज खंडित होण्याची समस्याही कमी होऊन वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीकामांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवीन ट्रान्सफॉर्मरच्या लोकार्पणप्रसंगी आमदार प्रशांत भाऊ बंब यांचे प्रतिनिधी कृष्णकांत व्यवहारे, ज्ञानेश्वर म्हस्के, अभिजित माळोदे, ज्ञानेश्वर सवई, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता गजानन ठोंबरे, अभियंता वाकळे, , , एकनाथ खंडागळे,लतीफ शहा,सचिन विधाते, अशोक रजवे, उमेश हजारे, गोकुळ म्हैसमाळे, आनंदा निकम, ताराचंद दुबिले, अशोक निकम, किशोर व्यवहारे, सुनील मुळे, अप्पासाहेब वल्ले, राम लेंढे, बद्री राऊत, विलास वल्ले, भिकचंद कोठुळे, गणेश वल्ले, विष्णू ठोकळ, प्रमोद ढोले, कल्याण ढोले, काकासाहेब मोगल, नवनाथ दुबिले,सोमनाथ तोगे, कृष्णा मनोहर यांच्यासह महावितरण कर्मचारी शितल एरंडे, बाळू कांबळे,संदीप घटे, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.

तीन वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर गावातील वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागल्याने शेंदरवादा येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी आमदार प्रशांत बंब यांचे आभार मानत समाधान व्यक्त केले.

निधनवार्ता

संभाजी चौधरी

श्रीरामपूर : कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव येथील प्रगतशील शेतकरी कै.संभाजी (तात्या) रामकृष्ण चौधरी यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.
त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे व नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रगतशील शेतकरी दिपक चौधरी व संदिप चौधरी यांचे ते वडील तर अशोक सहकारी साखर कारखाना कामगार पतसंस्थेचे चेअरमन भाऊसाहेब दोंड यांचे ते मेहुणे होत.

शिवाजी मुंगसे

बालाजी देडगाव : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील शिवाजी तुकाराम मुंगसे वय ५५ वर्ष यांना अल्पशा आजाराने निधन झाले
यांच्या पक्षात तीन मुली पत्नी नातवंडे एक भाऊ भाऊजाई आशा मोठा परिवार आहे देडगाव चे प्रगत शेतकरी महेश शिवाजी मुंगसे यांचे वडील होते